# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.11.2025** **वार- शनिवार**

---

**सौर ऊर्जा**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं सौर ऊर्जेच्या माध्यमातून स्वमालकीच्या विविध इमारतींवर सौर यंत्रणा कार्यान्वित केल्या असून, याद्वारे प्रतितास 3 मेगावॅट क्षमतेची वीज तयार होत आहे. यामुळे महापालिकेच्या वीजबिलात तब्बल 5 कोटी 91 लाख रुपयांची बचत झाली आहे. महापालिकेनं पिंपरी इथली  महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, शाळा, स्मशानभूमी, जलतरण तलाव, नाट्यगृह, बॅडमिंटन हॉल, रुग्णालय अशा विविध 86 ठिकाणी सौर पॅनेल्स बसवले आहेत. याद्वारे सप्टेंबर 2025 पर्यंत 59 लाख 17 हजार 112 युनिट्स वीजनिर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून आर्थिक बचतीबरोबरच शहराच्या पर्यावरणपूरक वाटचालीला चालना मिळत आहे.

**वसुंधरा**

पर्यावरण संवर्धन, हवामान बदल नियंत्रण आणि हरित जीवनशैलीचा प्रसार या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या “माझी वसुंधरा” या उपक्रमात ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन सहभागी व्हावं, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं नागरिकांना करण्यात आलं  आहे.

**खड्डेमुक्त रस्ते**

पुणे महापालिकेच्या वतीने येत्या सोमवार अर्थात 3 नोव्हेंबरपासून खड्डेमुक्त रस्ते विशेष अभियान राबविणार आहे. पथ विभाग आणि 15 क्षेत्रिय कार्यालयांच्या 15 पथकांद्वारे हे काम करण्यात येणार असल्याची माहिती  महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. पुणे शहरात मेट्रोचे काम, गृह विभाग आणि महापालिकेच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनासाठी सुरू असलेल्या फायबर केबल टाकण्यासाठीच्या खोदाईमुळे आणि पावसाळ्यामुळे शहरातील रस्त्यांची  चाळण झाली आहे. त्यामुळे पुणेकरांचे आरोग्य धोक्यात आले असून वाहतुकीचा वेग मंदावून कोंडीतही भर पडत आहे. शहरात जानेवारीमध्ये आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा होणार असल्याने महापालिका प्रशासनाने शहरातील सर्वच रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी पावले उचलली आहेत.

**<u>डॉ. सौम्या स्वामीनाथन</u>**

“कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय हा 21 व्या जगाचा स्टेथोस्कोप'' ठरणार आहे. आपण प्रतिजैविकांचा मारा शरीरावर इतक्या मोठ्या प्रमाणात करीत आहोत त्यामुळे 2050 पर्यंत सर्वाधिक मृत्यूचं कारण ही प्रतिजैविक औषधं ठरतील”, असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी संचालक डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी पुणे शहरातील व्याख्यानात काल दिला. पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या वतीनं पाषाण इथं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>सूचना</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या गड्यांमधून प्रवास करताना ज्या प्रवाशांना ॲपद्वारे किंवा क्यूआर कोडद्वारे तिकीट काढायचं आहे, त्यांना बसमध्ये बसण्यापूर्वीच तिकीट काढण्याच्या सूचना देणं वाहकांना बंधनकारक करण्यात आलं आहे. दरम्यान, नेटवर्कमध्ये अडथळा आल्यानं तिकीट काढायचं राहून गेल्यास किंवा टाळाटाळ केल्याचं तपासणीदरम्यान आढळून आल्यास संबंधित प्रवाशांवर ‘विनातिकीट धोरणानुसार दंडात्मक कारवाई’ करण्याचे आदेश तपासनीसांना देण्यात आले आहेत. पीएमपीचं उत्पन्न आणि सेवा-गुणवत्ता वाढविण्यासाठी आज प्रशासकीय मंडळाची बैठक पार पडली. यावेळी या सूचना करण्यात आल्या.

**<u>वकील</u>**

वकिलांवरील होणारे हल्ले रोखण्यासाठी तसच वकील संरक्षण कायद्याच्या मागणीसाठी राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाकडून येत्या सोमवारी कामकाजापासून अलिप्त राहणार असल्याचा ठराव करण्यात आला आहे. त्यामध्ये शिवाजीनगर न्यायालयासह जिल्ह्यातील सर्व न्यायालयातील वकील सहभागी होणार आहेत, अशी माहिती पुणे बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड यांनी दिली.

**<u>खेडकर मुलाखत</u>**

“आपल्या देशाला जमिनीचा तुकडा न मानता ती आपली मातृभूमी आहे, हे समजून तिच्या रक्षणाचं परमकर्तव्य प्रत्येक नागरिकानं मान्य केलं पाहिजे. आज सैन्यदलाला फक्त योद्ध्यांची गरज नसून विद्वान योद्ध्यांची आवश्यकता आहे”, असं प्रतिपादन निवृत्त ग्रुप कॅप्टन अभिजित खेडकर यांनी आज केलं. पुण्यात 23व्या पुणे पुस्तक जत्रा व मराठी साहित्य मेळा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये आज खेडकर यांच्याशी संवादात्मक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ आणि पत्रकार स्वप्नील पोरे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

**<u>पुलोत्सव</u>**

'सबकुछ पु. ल.' असं सूत्र असलेला यंदाचा ग्लोबल पुलोत्सव 06 ते 08 नोव्हेंबर 2025 या कालावधीत पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. यंदाचं हे वर्ष पुलंच्या 25 व्या स्मृतिदिनाचं आणि सुनीता देशपांडे यांच्या जन्मशताब्दीचं असल्यामुळे त्यामध्ये सन्मान सोहळा, पुलंविषयीचे सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्र, पुलंवरील लघुपट तसेच पुलंच्या साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील व्यंगचित्रकारांनी रेखाटलेली अर्कचित्र असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत महोत्सवाचे स्वागताध्यक्ष, कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल अजित गाडगीळ, महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार यांनी दिली.

**<u>मैदानी स्पर्धा</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विभागीय स्तराच्या महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये क्षितिज चांगिरी तर महिला गटात रुजुला भोसले यांनी 200 मीटर धावण्यात सुवर्णपदक मिळवले. तर मधुरा खांबे हिने लांबउडी आणि तिहेरी उडी या दोन्ही स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवून दुहेरी यश संपादन केले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. कमाल तापमान 27 तर किमान तापमान 19 पूर्णांक 06 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**